# रोजगाराची हमी देणारे शिक्षण द्यावे

## कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील; शिवाजी विद्यापीठाचा वर्धापन दिन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : 'केवळ पदवीधर घडविण्यापेक्षा निश्चित रोजगाराची हमी देणारे शिक्षण देण्याची जबाबदारी विद्यापीठांनी स्वीकारावी, असे आवाहन जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांनी आज येथे केले. उच्च शिक्षण क्षेत्रातील बदलांना सामोरे जाण्यास विद्यापीठांनी सज्ज व्हावे,' असेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापन दिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला. डॉ. पाटील म्हणाले, "सध्या उच्च शिक्षण क्षेत्रासमोर प्रतिकूल आव्हाने उभी राहत आहेत. जागतिक स्पर्धेत आपला विद्यार्थी कसा टिकेल, याची चिंता करण्याची वेळ प्रादेशिक विद्यापीठांवर आहे. यापुढील विद्यापीठांनीच समाजाकडे जाण्याची गरज आहे. त्या अनुषंगाने त्यांनी स्वतःच्या कार्यप्रणालीत व धोरणांत बदल करावा. पारंपरिक शिक्षण




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त बोलताना कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील. शेजारी डावीकडून प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.



अभ्यासक्रमांचा अंगीकार करणे आवश्यक आहे." असे सांगून ते म्हणाले, "संशोधन ही विद्यापीठांची अविभाज्य ओळख आहे. यापुढील काळात नावीन्यपूर्ण व समाजाभिमुख संशोधनाचे महत्त्व अबाधित राहणार आहे. त्या दृष्टीने प्रशासकीय संशोधनाच्या पलीकडे

जोरावर नवसंशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा पुरवाव्यात."

डॉ. शिंदे म्हणाले, "शिवाजी विद्यापीठात सेंटर फॉर व्हीएलएसआय डिझाईन आणि सेंटर फॉर नॅनो-फॅब्रिक्स ही दोन केंद्रे उभारण्यात येणार आहेत. सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्समध्ये नॅनो तंत्रज्ञानाच्या साह्याने आधुनिक कापडनिर्मितीच्या अनुषंगाने संशोधन करण्यात येणार आहे. भविष्यातील कपडे याच तंत्रज्ञानाच्या आधाराने निर्माण होणारे असतील. काळाची

### विशेष वेब-पेज

**बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांवरील विविध स्वरूपातील उपलब्ध ऑनलाईन स्रोतांचे एकत्रित संकलन करून त्याचे विशेष वेब-पेज विद्यापीठाच्या वेबसाईटवर निर्माण केले आहे. यामध्ये महाराजांवरील १४२ ई-बुक्स व ऑडिओ बुक्स, विकिपीडियावरील लिंक्स, चित्रपट आणि पीएच.डी. शोधप्रबंध या सामग्रीचा समावेश आहे.**

या आयआरएनएसएससाठी आवश्यक असणारे काही अत्यंत गुंतागुंतीच्या आणि महत्त्वाच्या चिप्स बनविण्याचे काम करण्यात येणार आहे."

विद्यापीठात इनक्युबेशन आणि इनोव्हेशन सेंटरची स्थापनाही करण्यात आली आहे. समाजातील प्रयोगशील आणि नवनवीन संकल्पना राबवू इच्छिणाऱ्या नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पना घेऊन विद्यापीठाकडे यावे. विद्यापीठाचे